# मराठी युवकभारती

**वेळ : ३ तास** **ऑक्टोबर - २००९** **गुण : ८०**

**प्र. १. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २५० ते ३०० शब्दांत निबंध लिहा :** (१०

(१) विज्ञान आणि अंधश्रद्धा (२) एका शेतकऱ्याचे मनोगत (३) वर्षाऋतूतील निसर्ग

(४) मला लॉटरी लागली तर..... (५) संस्काराने घडतो मानव

**प्र. २. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा :** (८

(१) अहिल्याबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन 'तरच मल्हारजी होळकरांची सून!' या उताऱ्यातून कशा प्रकारे घडते

(२) यशवंतराव चव्हाणांनी कोणती सामाजिक आव्हाने सांगितली आहेत ते लिहा.

(३) 'छलांग' कथेतील तानूने अचानक आलेल्या संकटाला कसे तोंड दिले ?

**प्र. ३. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा :** (८

(१) 'डुळ्कैलेया बाळकाचा दृष्टांत' या पाठात परमेश्वर कोणा एका व्यक्तीला पुन: पुन्हा शास्त्र का सांगत आहे

(२) जर्मन माणसाचे कोणते स्वभावविशेष फादर दिब्रिटो यांनी टिपले आहेत ?

(३) सलीम अली यांच्या 'किहिम' गावात पक्ष्यांच्या कोणकोणत्या लीला पाहायला मिळतात ?

(४) मारेकरी महात्मा फुले यांना मारण्यासाठी का आले होते ?

**प्र. ४. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा :** (८

(१) संत तुकारामांनी वारकऱ्यांच्या भक्तिसोहळ्यात तल्लीन झालेल्या अवस्थेचे वर्णन कसे केले आहे ?

(२) स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या देशभक्तीचे दर्शन 'सागरास' या कवितेतून कसे घडते ?

(३) माणसाने झाडांपासून कोणती जीवनमूल्ये घ्यावीत, असे कवी नीळकंठ महाजन यांना वाटते ?

**प्र. ५. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ८० शब्दांत लिहा :** (४

(१) संत मुक्ताबाईंनी योगी पुरुषाची कोणती लक्षणे सांगितली आहेत ?

(२) माणसांत शिरलेल्या दांभिकपणावरचा राग कवी मर्ढेकरांनी कसा व्यक्त केला आहे ?

(३) 'श्रीरंग' या कवितेत कवीने कोकणातील निसर्गाचे वर्णन कसे केले आहे ?

**प्र. ६. (क) खालीलपैकी कोणत्याही एका गद्य वाक्यातील आशयसौंदर्य स्पष्ट करा :** (२

(१) वसंतापेक्षाहि फुलांची हुकमत अधिक प्रखर आणि सूक्ष्म असते.

(२) केवळ नीतीचे धडे देऊन पोट भरत नसते.

(३) वडिलांची भीतीही त्यामुळं कधी वाटली नाही.

**(ख) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा :** (२

(१) लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ।।

(२) की बाप नवरा मुलगा
परंपरेच्या या काटेरी कुंपणातच
अडकून पडेल तिचा पदर ?

(३) मुलं कुठं खेळतात खेळपाणी
खेळतात 'युद्ध युद्ध'

**(ग) (१) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा :** (२

(१) फोंड सावंताने कोणता डोंगर बांधावयास जमाव पाठविला होता ?

(२) रॉबर्ट व पारो यांना कोणाच्या विरोधाला तोंड द्यावे लागले ?

(३) लहानशा हलक्याफुलक्या यानाला काय म्हणतात ?

(४) 'मातोसरी' या पाठाचे लेखक कोण ?

**(२) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा : (२)**

(१) हरी राजभुवनी कसा येतो ?

(२) वाटेवर काटे वेचीत चालत असताना कवी अनिल यांना काय वाटले ?

(३) 'बीन' कशी वाजते आहे ?

(४) आपण कोणत्या समाजात कवी झालो, असे दि. पु. चित्रे यांना वाटते ?

**प्र. ७. (क) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे १०० शब्दांत लिहा : (६)**

(१) 'मनाची बावरलेली अवस्था कळायला प्रौढ कुमारिकाच व्हायला पाहिजे,' असे लेखिका विभावरी शिरूरकर का म्हणतात?

(२) ओढ्याच्या पात्रात उभे राहिल्यावर पिराजीच्या मनात कोणते विचार आले ?

(३) आपल्या अस्तित्वासाठी प्रत्यक्ष पतीशी संघर्ष करणारी चंद्रकला लेखिकेने कशी रेखाटली आहे ?

**(ख) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे ६० शब्दांत लिहा : (४)**

(१) नर्मदा आपल्या मुलांविषयी समाधानी का नव्हती ?

(२) लेखिका कोणाला 'सोन्याचा टुकडा' म्हणत असे ? का ?

(३) कथानायिकेने बुवाला ब्रह्मचर्याबद्दल कोणता विचार ऐकविला ?

**प्र. ८. (१) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> अलंकाराचे लक्षण सांगून उदाहरण लिहा : (२)**

(१) श्लेष (२) अतिशयोक्ती

**(२) कंसातील सूचनेनुसार कोणत्याही <u>दोन</u> वाक्यांचे रुपांतर करा : (२)**

(१) जे ध्वनी या प्रदेशात घुमतात, ते मलाच ऐकू येतात. (केवल वाक्य करा.)

(२) त्याचे हात सुटले आणि तो एकदम गाडीच्या चाकाखाली आला. (मिश्र वाक्य करा.)

(३) त्यात कुटलंही शस्त्रास्त्र दिसत नाही. (वाक्यप्रकार ओळखा.)

**(३) खालीलपैकी कोणत्याही <u>चार</u> पारिभाषिक शब्दांचे अर्थ लिहा : (२)**

(१) Agreement (२) Fitness (३) Basic pay

(४) Gate-pass (५) Data (६) Intimation

**(४) खालीलपैकी कोणतेही <u>एक</u> वाक्य लेखननियमांनुसार लिहा : (२)**

(१) ही प्रेरणा नीर्मितीचे मुळ आहे.

(२) अश्या संकूचित निष्ठांच्या आहारी आपण जातो.

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करुन वाक्य पुन्हा लिहा :**

(१) मला भारतातच आणि तेही मराठी कुटुंबात जन्माला घाल

(२) "काय बाई तुम्ही घरात बकऱ्या ठेवल्या होत्या"

**(५) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> वाक्प्रचारांचा अर्थ सांगून स्वत:च्या वाक्यांत उपयोग करा : (२)**

(१) नामोहरम करणे (२) रुद्रावतार धारण करणे (३) इरेला पेटणे (४) अनर्थ टळणे

**प्र. ९. (क) खालीलपैकी कोणतेही <u>एक</u> पत्र लिहा : (४)**

(१) तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयात रात्र अभ्यासिकेची व्यवस्था करण्याविषयी प्राचार्यांना पत्र लिहा.

(२) विजेचे देयक चुकीने जादा येत असल्याबद्दलची तक्रार करणारे पत्र संबंधित अधिकाऱ्यास लिहा.

**(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :** (३

हास्य ही जीवनातली एक मूलभूत प्रवृत्ती आहे. वाङ्मयामध्ये त्याला रसाचे स्थान प्राप्त झाले आहे. शब्दांच्या योजने हास्यरस निर्माण करणे याला विनोद म्हणतात. विनोद ही एक कला आहे आणि त्याचे स्वतंत्र शास्त्रही आता निर्माण झाले आहे. सुशिक्षित अन् सुसंस्कृत माणसांच्या समाजात आणि वाङ्मयात विनोदाला फार मोठी प्रतिष्ठा आहे, किंबहुना विनोदबुद्धी असणे हे संस्कृतीचे लक्षण समजले जाते. विनोद हा काही नुसता शब्दांचा खेळ नाही. ती जीवनाकडे पाहण्याची एक विशाल दृष्टी आहे. व्यक्तीच्या किंवा समाजाच्या बुद्धीचा विकास झाल्यावाचून ही दृष्टी त्यांना प्राप्त होत नाही. ज्या समाजात व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्य आहे, त्या समाजात तारुण्याचे वातावरण उत्पन्न होते, खेळ, कला, उत्सव यांची वाढ होते आणि सामाजिक जीवन समृद्ध होते.

**-आचार्य प्र. के.अत्रे**

**('विनोद गाथा')**

**प्रश्न :**

(१) लेखकाच्या मते विनोद कशाला म्हणतात ? (१

(२) जीवनाकडे पाहण्याची विशाल दृष्टी केव्हा प्राप्त होते ? (१

(३) सामाजिक जीवन केव्हा समृद्ध होते ? (१

**किंवा**

वरील गद्य उताऱ्याचा सुमारे <u>एकतृतीयांश</u> (१/३) एवढा <u>सारांश</u> तुमच्या शब्दांत लिहा.

**(ग) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर निमंत्रणपत्रिका लिहा :** (३

(१) ग्रंथ प्रदर्शन : उद्घाटन सोहळा.

(२) कनिष्ठ महाविद्यालयात आयोजिलेल्या जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ.

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर कार्यक्रमपत्रिका तयार करा :**

(१) महाविद्यालयातील शिक्षक दिन समारंभ.

(२) महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन.

**किंवा**

**खालील विषयावर वर्तमानपत्रासाठी कार्यक्रमाचा वृत्तान्त तयार करा :**

तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयात संपन्न झालेला प्रजासत्ताक दिन सोहळा.

❖ ❖ ❖